R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ८८

दि.१८ मार्च २०२६,वार: बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## शासकीय तंत्रनिकेतन ठाणे येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

ठाणे(जिमाका) :- स्त्री शिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत, शासकीय तंत्रनिकेतन ठाणे येथे जागतिक महिला दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.




या निमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात महिला सक्षमीकरण आणि सामाजिक बांधिलकीचा जागर करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून ठाणे जिल्हा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी पाटील उपस्थित होत्या. संस्थेचे प्राचार्य डॉ. डी. आर. महाजन यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. व्यासपीठावर संस्थेचे जिमखाना उपाध्यक्ष डॉ. संजय मोतलिंग, महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा श्रीमती बी. जे. चौधरी आणि संस्थेच्या प्रबंधक श्रीमती संगीता चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाचा रीतसर प्रारंभ झाला. डॉ. संजय मोतलिंग यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडून उपस्थितांचे स्वागत केले. संस्थेच्या वतीने प्रमुख पाहुण्यांना भारतीय संविधानाचे पुस्तक व गुलाब पुष्प देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

### "Give To Gain' उपक्रम

यावर्षीच्या महिला दिनाचे औचित्य साधून संस्थेने ऋळींश ढे ऋरळप ही नाविन्यपूर्ण संकल्पना राबविली आहे. या उपक्रमांतर्गत संस्थेतील महिला अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थिनी एकत्रित येऊन महिला आधार केंद्रांना सशक्त बनवण्यासाठी मदतीचा हात देणार आहेत, अशी माहिती अधिव्याख्याता श्रीमती संगीता बनोरे यांनी दिली.

प्रमुख पाहुण्या श्रीमती अश्विनी पाटील यांनी आपल्या भाषणात विद्यार्थिनींना महिला सक्षमीकरणाचे महत्त्व पटवून दिले, तसेच स्पर्धा परीक्षांच्या .मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात विद्यार्थिनींनी आपले कलागुण सादर केले. यामध्ये गायन, लेझीम आणि बहारदार भाषणांचा समावेश होता, ज्यामुळे कार्यक्रमात मोठी रंगत आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगणक अभियांत्रिकी विभागाच्या अधिव्याख्याता जयश्री साळुंखे यांनी केले.

या कार्यक्रमास संस्थेतील महिला प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली. विद्यार्थिनींच्या सक्रिय सहभागामुळे हा सोहळा अत्यंत संस्मरणीय ठरला.

## मुंबई विद्यापीठात पाली भवन; निर्माण करा..! भंते विमांसा यांच्या समर्थनार्थ आंबेडकरी जनतेने आझाद मैदान मुंबई येथे धरणा प्रदर्शन केले

मुंबई प्रतिनिधी / के. एच. हनवते : १६ मार्च २०२६ रोजी आझाद मैदान, मुंबई येथील आंबेडकरी जनतेचे धरणा प्रदर्शन आंदोलन करण्यात आले,




कलिना मुंबई विद्यापीठातील झ.हव विद्यार्थी : भंते विमांसा यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ला जाहीर निषेध व पाली भाषा विभागाच्या न्याय्यं हक्कांच्या मागण्यांसाठी, भंते पूर्ण यांच्या नेतृत्वाखाली पाली भाषा संवर्धन समिती व जातीअंत संघर्ष समिती महाराष्ट्र, सह आंबेडकर चळवळीतील अनेक छोट्या मोठ्या संघटना यांनी या आक्रोश मोर्चात मुंबई, पालघर, कल्याण, टिटवाळा, ठाणे, रायगड, पनवेल, नवी मुंबई व महाराष्ट्रातील दुर-दुरून, या आक्रोश मोर्चात बौद्ध- आंबेडकरी जनता सामील झाली होती, सर्वांनी एकच हल्लाबोल केला की, कलीना मुंबई विद्यापीठात पाली भवन व पाली भाषा विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वस्तीग्रह उभारण्यात यावे व त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना सोयी, सुविधा उपलब्ध करून देण्यात यावेत इत्यादी मागण्या संदर्भात गेली सात महिन्यापासून भंते विमांसा आणि पूर्ण भंते यांच्या वतीने आंदोलन होत आहे, पण या आंदोलनाला स्थानिक भंतेजींनी याकडे दुर्लक्ष का ? केले..! हीच सर्वत्र चर्चा होताना दिसली, हे आंदोलन कोणत्या एका व्यक्तिगत विद्यार्थ्यांचे नसून या विभागात पाली शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे व इथून पुढे शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे आणि म्हणून यासंदर्भात पूर्ण भंते यांनी आपल्या शिष्टमंडळासह मंत्रालय शिक्षण विभाग मंत्री : चंद्रकांत पाटील यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात आले, तेंव्हा शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आश्वासित केले की, सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन असल्यामुळे सर्व मंत्रिमंडळ तिकडे बिझी आहेत, त्यामुळे आम्ही २५ मार्च नंतर मुंबई विद्यापीठाला सदिच्छा भेट देऊन सर्व शहानिशा करून पुढील कामकाज केले जाईल..! असे आश्वासन दिले, पण यावर बौद्ध-आंबेडकर समाज बांधव समाधानी नसल्याचे चित्र पहिला मिळाले, कारण की गेली वीस दिवस झाले भन्ते विमांसा यांना जातीवादी कर्मचाऱ्यांनी त्यांना रूमच्या बाहेर काढलेले असुन भंतेजींना अतिशय भयानक परिस्थितीमध्ये अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे, मुंबई विद्यापीठातील जातीवाद्यांनी त्यांना कसल्याही प्रकारची सोयी, सुविधा द्यायची नाही असे त्यांच्यावर बंधन घातले आहे, इतकेच काय तर त्यांना आंघोळ करण्यासाठी बाथरूमचा वापर पण करू दिला जात नाही, भंतेजीकडे अंथरूण नाही, पांघरूण नाही, किंवा त्यांच्याकडे कसल्याही प्रकारचे वस्तू, कपडे वगैरे नाहीत, भंते विमांसा हे एकाच चिवर वरती गेल्या वीस दिवसापासून उघड्यावर वास्तव्य करत असल्याने त्यांना मच्छर वगैरे चाऊन कधी ही बिमारी होऊ शकते, आणि त्यात त्यांचा जीव वैगरे गेला तर... याला सर्वस्वी प्रशासन शिम्मेदार असेल..! याची नोंद शासनाने घ्यावी, व कधीही त्या ठिकाणी विचित्र प्रकार घडू शकतो अशीच सर्वत्र चर्चा होत आहे आणि म्हणून आता आपण लवकरच मुंबई विद्यापीठा समोरच चक्काजाम आंदोलन समस्त बौद्ध- आंबेडकरी समाज बांधवांच्या वतीने करण्यात येणार आहोत.

## एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत 'लोकोत्सव' सांस्कृतिक कार्यक्रमाचे दिल्ली येथे आयोजन

नवी दिल्ली : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक भारत श्रेष्ठ भारत' या उपक्रमांतर्गत महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडविणाऱ्या 'लोकोत्सव' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम दि. १९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत सभागृह, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आला आहे.

एक भारत श्रेष्ठ भारत' या उपक्रमाचा उद्देश देशातील विविध राज्यांमधील सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवून राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ करणे हा आहे. त्याच अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या 'लोकोत्सव' या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्रातील विविध लोककला, लोकगीत, लोकनृत्य तसेच पारंपरिक वाद्यसंगीत यांचे आकर्षक सादरीकरण करण्यात येणार असून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन रसिकांना घडणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लोकपरंपरा, सांस्कृतिक वारसा आणि पारंपरिक कलांचा परिचय देशभरातील प्रेक्षकांना करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री मा. ड. आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

दिल्ली व परिसरातील महाराष्ट्रप्रेमी नागरिक, विद्यार्थी, सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी तसेच रसिक प्रेक्षकांनी या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ठाण्याचे योगज्ज्ञ डॉ. कुंभार यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान

ठाणे(जिमाका) : येथील डीएव्ही



पब्लिक स्कूलचे योग शिक्षक आणि योगतज्ज्ञ डॉ. अजय कुंभार यांना स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र आणि श्रीलंकेतील भारतीय उच्चायोगाकडून विशेष प्रशंसापत्राने सन्मानित करण्यात आले आहे. श्रीलंकेतील नागरिकांसाठी ऑनलाईन पद्धतीने सन २०२० पासून आयोजित ऑनलाईन योग सत्रांमध्ये डॉ. कुंभार सलगपणे योगदान देत आहेत. त्याबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला आहे.

डॉ. कुंभार यांनी आतापर्यंत नियमित, संरचित आणि शिस्तबद्ध योग कार्यक्रमांद्वारे योग, आरोग्य, मानसिक संतुलन आणि भारतीय सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या सेवांमुळे श्रीलंकेत भारतीय संस्कृती आणि योगाची ओळख केवळ मजबूत झाली नाही तर जागतिक स्तरावर भारताचा हा बहुमोल वारसा स्थापित झाला आहे. 'वसुधैव कुटुंबकम' या भावनेला मूर्त रूप दिले आहे.

डॉ. कुंभार यांनी योग विषयातच पदव्युत्तर पदवी प्राप्त केली असून, पीएचडीच्या माध्यमातून योगातच त्यांनी संशोधन केले आहे. स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्रातर्फे त्यांचा झालेला सन्मान हा त्यांच्या योगातील योगदाचा गौरव आहे.

## स्थायी व परिवहन समिती सभापतींची मंगळवारी निवड

लातूर/ प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी व परिवहन समिती सभापतींची निवड मंगळवार दि.२४ मार्च रोजी होणार आहे.

विभागीय आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार सभापती निवडीसाठी ही तारीख निश्चित करण्यात आली आहे.यासाठी मंगळवार दि.१७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता नामनिर्देशन पत्रांच्या अर्जांची विक्री सुरू झाली.शुक्रवार दि.२० मार्च रोजी सकाळी ११ ते २ या कालावधीत महापालिका सचिवांकडे नामनिर्देशन पत्र दाखल करता येतील.

मनपाच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात मंगळवार दि.२४ रोजी पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सभेत नामनिर्देशन पत्रांची छाननी होईल.याच दिवशी उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. त्यानंतर स्थायी व परिवहन समिती सभापतींची निवड केली जाईल. यासाठी हात वर करून मतदान घेतले जाईल,अशी माहिती महापालिका सचिवांकडून देण्यात आली.

## संपादकीय...

# गॅस तुटवडा वाढता चिंतेचा विषय

देशात सध्या घरगुती गॅसचा तुटवडा जाणवू लागला असून, सामान्य नागरिकांसाठी हा मोठा चिंतेचा विषय ठरत आहे. स्वयंपाकासाठी अत्यावश्यक असलेला एलपीजी गॅस वेळेवर उपलब्ध होत नसल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे.

विशेषतः ग्रामीण भागात परिस्थिती अधिक गंभीर आहे. अनेक ठिकाणी सिलिंडर मिळण्यासाठी आठवडेभर प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे महिलांना पुन्हा लाकूड किंवा इतर पारंपरिक इंधनांचा वापर करावा लागत आहे.

शहरी भागातही गॅस वितरणात अनियमितता दिसून येत आहे. ऑनलाइन बुकिंग केल्यानंतरही ग्राहकांना वेळेवर गॅस मिळत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गॅस तुटवड्यामुळे काही ठिकाणी काळाबाजारही वाढताना दिसत आहे. अधिक पैसे देऊन सिलिंडर मिळवण्याची वेळ ग्राहकांवर येत आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

या समस्येमागे आंतरराष्ट्रीय बाजारातील इंधन दरवाढ हे एक प्रमुख कारण मानले जात आहे. तसेच पुरवठा साखळीतील अडचणी आणि वाढती मागणी यामुळे तुटवडा अधिक तीव्र झाला आहे.

वाहतूक व्यवस्थेतील अडथळे आणि स्थानिक पातळीवरील नियोजनाचा अभाव यामुळे गॅस वितरणावर परिणाम होत आहे. त्यामुळे उपलब्ध साठाही वेळेवर ग्राहकांपर्यंत पोहोचत नाही.

सरकारने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

गॅस कंपन्यांनीही वितरण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम करणे गरजेचे आहे. ग्राहकांना वेळेवर माहिती मिळाल्यास त्यांची गैरसोय कमी होऊ शकते.

गरजू आणि गरीब कुटुंबांसाठी विशेष सवलती आणि अनुदान योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. यामुळे त्यांना दिलासा मिळू शकतो.

तंत्रज्ञानाचा वापर करून गॅस वितरण अधिक सुलभ करता येऊ शकते. ट्रॅकिंग प्रणाली आणि तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे काळाची गरज आहे.

नागरिकांनीही गॅसचा वापर जपून करणे आवश्यक आहे. अनावश्यक वापर टाळल्यास तुटवड्यावर काही प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल.

दीर्घकालीन उपाय म्हणून पर्यायी ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवणे गरजेचे आहे. सौरऊर्जा आणि बायोगॅस यांसारखे पर्याय भविष्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

एकूणच, गॅस तुटवडा हा केवळ तात्पुरता प्रश्न नसून तो ऊर्जा सुरक्षेशी संबंधित आहे. योग्य वेळी योग्य निर्णय घेतले, तरच या समस्येवर मात करता येईल.

# मिशन शितल कवच :वाढत्या उष्मालाटेचा मुकाबला करण्यासाठी ठाणे जिल्हा प्रशासन सज्ज

राज्यात दरवर्षी उन्हाचा पारा वाढत आहे. उष्णतेच्या लाटेमुळे केवळ अस्वस्थता येत नाही, तर ती जीवघेणीही ठरू शकते. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता, प्रशासकीय विभाग, महानगरपालिका,आरोग्य यंत्रणा आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने एकत्रितपणे राबवायच्या उपाययोजनांचा हा 'क्शन प्लॅन'.

१. नागरी सुविधा : सावली आणि पाणी हाच आधार

महानगरपालिका आणि नगरपालिकांनी सार्वजनिक ठिकाणी (बस स्टँड, बाजार, रिक्षा स्टँड) तात्पुरत्या शेडची व्यवस्था करावी. 'वॉटर एटीएम' किंवा पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून द्यावी. शॉपिंग मॉल्सनी केवळ ग्राहकांसाठीच नव्हे, तर सर्वसामान्यांसाठीही थंड पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत शहरातील उद्याने खुली ठेवून नागरिकांना विसावा घेण्याची संधी द्यावी.

२. आरोग्य यंत्रणा : 'गोल्डन अवर'मध्ये उपचार

* स्वतंत्र वॉर्ड: प्रत्येक रुग्णालयात उष्माघाताच्या (क्शरीं डीीज्ञश) रुग्णांसाठी वातानुकूलित किंवा थंड वॉर्ड असावेत.

* जलद प्रतिसाद टीम (ठठढ): उष्माघाताची लक्षणे दिसताच तात्काळ उपचार करण्यासाठी विशेष पथके तैनात असावीत.

* असुरक्षित गट: लहान मुले, वृद्ध, गरोदर महिला आणि मजुरांकडे विशेष लक्ष देण्यासाठी आशा वर्कर व अंगणवाडी सेविकांनी घरोघरी जाऊन जनजागृती करावी.

३. शिक्षण आणि कामगार : वेळापत्रकात बदल अनिवार्य

* शाळा: उन्हाची तीव्रता पाहता शाळा सकाळच्या सत्रात भराव्यात किंवा आवश्यकतेनुसार सुट्ट्या जाहीर कराव्यात. मैदानावरील खेळ दुपारी टाळावेत. मध्यान्ह भोजनात ताक किंवा ओआरएस (जठड) यांचा समावेश करावा.

* मजूर: 'मनरेगा' आणि बांधकामावरील मजुरांच्या कामाच्या वेळा बदलाव्यात. कामाच्या ठिकाणी छप्पर आणि थंड पाणी असणे मालकाची जबाबदारी असेल. मजुरांना 'सीपीआर' (उझठ) चे प्राथमिक प्रशिक्षण द्यावे.

४. प्राणी आणि पर्यावरण : निसर्गाचीही काळजी

वन विभागाने वन्यप्राण्यांसाठी जंगलात पाणवठे तयार करावेत. पशुधन विभागाने जनावरांच्या गोठ्यात थंड पाण्याची आणि हिरव्या चाऱ्याची सोय करण्यासाठी पशुपालकांना मार्गदर्शन करावे.

५. पोलीस आणि वाहतूक विभाग

ट्रॅफिक सिग्नलवर कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांसाठी छत्री किंवा बूथची सोय करावी. सर्व सार्वजनिक बसमध्ये प्रथमोपचार पेटी आणि ओआरएस पाकीट उपलब्ध असावेत.

*उष्मालाटेपासून बचावासाठी 'हे' नक्की करा (छझउउक्क मार्गदर्शक सूचना)*

*काय करावे? (ऊीं)*

* भरपूर पाणी प्या: तहान लागलेली नसली तरीही दिवसातून वारंवार पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवणे हा उष्माघातापासून वाचण्याचा सर्वोत्तम उपाय आहे.

* सोबत पाणी ठेवा: प्रवासादरम्यान किंवा बाहेर पडताना पाण्याची बाटली नेहमी सोबत ठेवा.

* नैसर्गिक पेयांचे सेवन करा: आहारात लिंबू पाणी, ताक, लस्सी, फळांचा रस आणि नारळ पाणी यांसारख्या घरगुती पेयांचा समावेश करा.

* ओआरएस (जठड) वापरा: शरीरातील क्षारांचे प्रमाण कमी होऊ नये म्हणून ओआरएस द्रावणाचा वापर करा.

* पाणीदार फळे आणि भाज्या खा: टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी आणि कोशिंबीर यांसारख्या जास्त पाणी असलेल्या हंगामी फळांचे व भाज्यांचे सेवन करा.

* योग्य कपड्यांची निवड: बाहेर जाताना पातळ, सैल आणि हलक्या रंगाचे सुती कपडे वापरावेत.

* डोके आणि शरीर झाकून ठेवा: थेट सूर्यप्रकाश टाळण्यासाठी बाहेर पडताना छत्री, टोपी, टॉवेल किंवा दुपट्ट्याचा वापर करा. डोके झाकून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

* पादत्राणे वापरा: कडक उन्हात अनवाणी फिरू नका, बाहेर जाताना नेहमी बूट किंवा चपलांचा वापर करा.

* हवामानाची माहिती घ्या: रेडिओ, टीव्ही, वृत्तपत्रे किंवा भारतीय हवामान विभागाच्या (खचऊ) संकेतस्थळावरून उष्णतेच्या लाटेबाबतच्या सूचना आणि अपडेट्स नियमितपणे पाहत राहा.

* थंड ठिकाणी राहा: दिवसा शक्यतो हवेशीर आणि थंड ठिकाणी राहण्याचा प्रयत्न करा. खिडक्यांना पडदे लावा आणि रात्री थंड हवा येण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा.

* कामाचे नियोजन: घराबाहेरची कष्टाची कामे शक्यतो सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा, जेव्हा तापमान कमी असते, तेव्हा पूर्ण करा.

*काय करू नये? (ऊेप'ीं)*

* भर उन्हात फिरणे टाळा: विशेषतः दुपारी १२:०० ते ३:०० या कालावधीत, जेव्हा उष्णता सर्वाधिक असते, तेव्हा घराबाहेर पडणे टाळावे.

* कठोर शारीरिक श्रम टाळा: दुपारच्या वेळी बाहेर असताना ओझे उचलणे किंवा कष्टाची शारीरिक कामे करू नका.

* विशिष्ट पेयांचे सेवन टाळा: अल्कोहोल (मद्य), चहा, कॉफी आणि मोठ्या प्रमाणात साखर असलेली कार्बोनेटेड सॉफ्ट ड्रिंक्स पिणे टाळा, कारण यामुळे शरीरातील पाणी वेगाने कमी होते.

* चुकीचा आहार टाळा: जास्त प्रथिने असलेले अन्न (उदा. मांसाहार) आणि शिळे अन्न खाणे टाळावे.

* उन्हात स्वयंपाक टाळा: घरामध्ये हवा खेळती नसल्यास अति उष्णतेच्या वेळी (दुपारी) स्वयंपाक करणे टाळा. स्वयंपाकघराचे दरवाजे आणि खिडक्या उघड्या ठेवा.

* वाहनांमध्ये कोणालाही सोडू नका: उभ्या असलेल्या किंवा पार्क केलेल्या वाहनांमध्ये लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना एकटे सोडू नका. बंद गाडीतील तापमान काही मिनिटांतच जीवघेणे ठरू शकते.

* अंधाधुंद श्रम नको: जर तुम्ही थंड प्रदेशातून उष्ण ठिकाणी आला असाल, तर तुमच्या शरीराला तिथल्या तापमानाशी जुळवून घेण्यासाठी किमान एक आठवडा द्या; लगेच जास्त श्रम करू नका.

*प्रशासकीय समन्वय आणि आपत्ती व्यवस्थापन..*

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (ऊऊच) प्रत्येक तालुक्यात 'नोडल अधिकारी' नियुक्त करून दैनंदिन अहवाल घ्यावा. स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने गरजूंपर्यंत छत्री आणि पादत्राणे पोहोचवावीत. समाजमाध्यमांचा वापर करून नागरिकांना हवामानाचे नियमित अपडेट्स द्यावेत.

सावध राहा, सुरक्षित राहा! उन्हाच्या झळांपासून स्वतःचा आणि इतरांचा बचाव करणे, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (ऊऊच) अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप माने आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ यांनी केले आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**ठाणे / रायगड**

# वृध्दाश्रम आणि कुटुंबसंस्कृती : एक वेदनादायी वास्तव

आज भारतात हजारो वृद्धाश्रम उभे राहिले आहेत. मोठ्या शहरांपासून ते लहान गावांपर्यंत अनेक ठिकाणी वृद्धाश्रमांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसते. हे वृद्धाश्रम म्हणजे केवळ इमारती नाहीत; त्या आपल्या समाजाच्या बदलत्या मानसिकतेचे, तुटत चाललेल्या कुटुंबव्यवस्थेचे आणि नात्यांतील दुराव्याचे जिवंत प्रतीक आहेत. परंतु या वास्तवाकडे पाहताना एक प्रश्न अनेकदा समोर येतो की, देशात इतके वृद्धाश्रम असताना त्यामध्ये मुस्लिम समाजातील वृद्ध व्यक्ती फारच कमी का दिसतात? हा प्रश्न केवळ धर्माचा नाही, तर संस्कृती, कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक मूल्यांचा विचार करण्यास भाग पाडणारा आहे. भारतीय संस्कृतीत ‘मातृदेवो भव, पितृदेवो भव’ ही संकल्पना हजारो वर्षांपासून सांगितली जाते. आई-वडील हे देवतुल्य आहेत, त्यांची सेवा करणे हे कर्तव्य आहे, असा संस्कार आपल्या समाजात दिला जातो. तरीही आज वास्तव वेगळे दिसते. अनेक वृद्ध आई-वडील आपल्या मुलांच्या घरात नव्हे, तर वृद्धाश्रमात दिवस काढताना दिसतात. ज्यांनी आपल्या आयुष्याची संपूर्ण कमाई, श्रम आणि प्रेम मुलांच्या भविष्याकरिता अर्पण केले, त्यांनाच शेवटी परकेपणाची शिक्षा भोगावी लागते. हा विरोधाभास समाजाच्या मनाला अस्वस्थ करणारा आहे.

वृद्धाश्रमांमध्ये राहणाऱ्या अनेक वृद्धांच्या कथा ऐकल्या, तर मन हेलावून जाते. काहींची मुले परदेशात स्थायिक झालेली असतात, काहींना मुलांकडे वेळ नसतो, तर काहींना घरातच उपेक्षा आणि अपमान सहन करावा लागतो. त्यामुळे ते वृद्धाश्रमाचा पर्याय स्वीकारतात. काही वेळा ही निवड स्वेच्छेची नसते, तर परिस्थितीची जबरदस्ती असते. वृद्धाश्रम म्हणजे सुरक्षित आसरा असला, तरी त्यामागे दडलेली वेदना मात्र खोल असते, ती म्हणजे आपल्या लोकांनी दिलेली एकाकीपणाची शिक्षा. परंतु दुसरीकडे मुस्लिम समाजाकडे पाहिले, तर अनेकदा असे दिसते की वृद्ध आई-वडील कुटुंबातच राहतात. संयुक्त कुटुंबाची परंपरा, धार्मिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी यामुळे वृद्धांची जबाबदारी ही कुटुंबाचीच मानली जाते. इस्लाम धर्मात पालकांची सेवा ही अत्यंत पवित्र कर्तव्य मानली जाते. कुरआनमध्येही आई-वडिलांच्या सेवेला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. त्यामुळे वृद्ध आई-वडिलांना घराबाहेर ठेवणे हे सामाजिकदृष्ट्या नाकारलेले वर्तन मानले जाते. ही गोष्ट केवळ धार्मिक शिकवणीची नाही, तर संस्कारांची आहे.

मात्र याचा अर्थ असा नाही की एका समाजात सर्व काही आदर्श आहे आणि दुसऱ्यात सर्व काही चुकीचे आहे. बदलत्या काळात प्रत्येक समाजासमोर आव्हाने उभी आहेत.

शहरांमध्ये वाढती स्थलांतराची प्रक्रिया, नोकरीच्या बदलत्या पद्धती, लहान होत चाललेली कुटुंबव्यवस्था आणि वाढती स्पर्धा यामुळे नात्यांवरही परिणाम होत आहे. आज अनेक कुटुंबांमध्ये आई-वडिलांना वेळ देणे कठीण होत चालले आहे. त्यामुळे वृद्धाश्रमांची गरज निर्माण झाली आहे. पण येथे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो की, आपण विकासाच्या नावाखाली नात्यांचे मूल्य विसरत आहोत का? आधुनिकतेच्या प्रवाहात आपण कुटुंबव्यवस्थेचा पाया दुर्बल करत आहोत का? भौतिक सुखसुविधा वाढल्या असल्या, तरी भावनिक जवळीक कमी होत चालली आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया या माध्यमांमुळे संवाद वाढल्यासारखा वाटतो पण प्रत्यक्षात माणसामाणसांतील संवाद कमी होत आहे.

आज अनेक वृद्ध व्यक्ती म्हणतात आम्हाला पैशांची गरज नाही, फक्त मुलांनी दोन प्रेमाचे शब्द बोलावेत. ही साधी अपेक्षा आहे; पण तीही अनेकदा पूर्ण होत नाही. वृद्धाश्रमांमध्ये अनेक आई-वडील दिवसभर आपल्या मुलांच्या फोनची वाट पाहत बसतात. सण-उत्सवांच्या दिवशी त्यांची वेदना अधिक तीव्र होते. कारण त्या दिवशी कुटुंबाची उब सर्वाधिक जाणवते. या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजातील कुटुंबव्यवस्थेचा विचार केला, तर काही मूल्ये शिकण्यासारखी वाटतात. वृद्धांना घरातील मानाचे स्थान देणे, त्यांच्या अनुभवाचा आदर करणे, कुटुंबातील निर्णयांमध्ये त्यांना सहभागी करून घेणे ही परंपरा अजूनही अनेक ठिकाणी टिकून आहे. ही गोष्ट केवळ एका धर्मापुरती मर्यादित नसून, ती मानवी मूल्यांची शिकवण आहे. परंतु त्याचवेळी हेही लक्षात घ्यायला हवे की वृद्धाश्रम ही संकल्पना पूर्णपणे नकारात्मक नाही. काही वृद्ध व्यक्ती स्वतःच्या इच्छेनेही वृद्धाश्रमात राहणे पसंत करतात. कारण तेथे त्यांना समान वयाच्या लोकांमध्ये राहण्याची संधी मिळते, आरोग्यसेवा मिळते आणि एकाकीपणाही कमी होतो. त्यामुळे वृद्धाश्रमांना पूर्णपणे दोष देणे योग्य नाही. पण जर कुटुंब असूनही आई-वडिलांना वृद्धाश्रमात राहावे लागत असेल, तर ते समाजासाठी नक्कीच चिंतेचे कारण आहे.

भारतीय समाजाच्या संस्कृतीचा पाया कुटुंबव्यवस्थेवर उभा आहे. कुटुंब म्हणजे केवळ रक्ताचे नाते नाही; ते प्रेम, जबाबदारी आणि परस्पर आदर यांचे जिवंत रूप आहे. जर कुटुंबातील नात्यांमध्येच दुरावा निर्माण झाला, तर समाजाच्या मूलभूत मूल्यांवरच प्रश्नचिन्ह उभे राहते. आज गरज आहे ती नव्या पिढीला योग्य संस्कार देण्याची. मुलांना लहानपणापासूनच आई-वडिलांचा आदर करणे, त्यांची सेवा करणे आणि त्यांच्या भावना समजून घेणे शिकवले पाहिजे. शाळा, समाज आणि माध्यमांनीही या विषयावर सकारात्मक संदेश द्यायला हवा. तसेच सरकार आणि समाजानेही वृद्धांच्या समस्यांकडे अधिक संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा, निवृत्तीवेतन आणि मानसिक आधार या गोष्टी मजबूत करणे गरजेचे आहे. वृद्धांचे आयुष्य सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगता आले पाहिजे.

खरं तर प्रत्येक माणसाचे आयुष्य एक पूर्ण वर्तुळ असते. आज जो तरुण आहे, तो उद्या वृद्ध होणार आहे. त्यामुळे आज आपण वृद्धांकडे कसे पाहतो, त्यावर उद्याच्या समाजाचे चित्र अवलंबून आहे. जर आपण आज आपल्या आई-वडिलांना सन्मान दिला, तर उद्या आपल्यालाही तोच सन्मान मिळेल. वृद्धाश्रमांची वाढ ही केवळ सामाजिक बदलाची खूण नाही; ती एक इशारा आहे, नात्यांची उब जपण्याचा. आपण आधुनिक होऊ, प्रगती करू; पण त्याचवेळी आपल्या संस्कृतीची मुळेही जपली पाहिजेत. कारण माणसाला खरे समाधान संपत्तीमध्ये नाही, तर नात्यांच्या उबेत मिळते. आई-वडिलांनी आयुष्यभर आपल्या मुलांसाठी स्वप्ने पाहिली, त्याग केला, संघर्ष केला. त्यांच्या वृद्धत्वात त्यांना फक्त एकच गोष्ट हवी असते आपुलकी. जर आपण ती देऊ शकलो, तर वृद्धाश्रमांची गरज कदाचित कमी होईल.

आज समाजाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे की, आपण प्रगतीच्या शर्यतीत धावताना आपल्या आई-वडिलांना मागे तर सोडत नाही ना? जर या प्रश्नाचे उत्तर प्रामाणिकपणे शोधले, तर कदाचित आपल्या समाजाला नव्या दिशेचा मार्ग सापडेल. वृद्धांचा सन्मान हा केवळ संस्कृतीचा भाग नाही; तो माणुसकीचा पाया आहे. ज्या समाजात वृद्धांचा आदर केला जातो, तो समाज खऱ्या अर्थाने प्रगत मानला जातो. म्हणूनच आज गरज आहे ती नात्यांना पुन्हा जिवंत करण्याची, कुटुंबव्यवस्थेला बळ देण्याची आणि आई-वडिलांच्या प्रेमाचे ऋण कृतज्ञतेने फेडण्याची. कारण शेवटी सत्य एकच आहे, ज्या हातांनी आपल्याला चालायला शिकवले, त्या हातांना वृद्धत्वात आधार देणे आणि हेच खरे संस्कार आहेत.

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# ठाणे जिल्ह्यात एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

ठाणे (जिमाका):- आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य इंधन टंचाईच्या काळात, ठाणे जिल्ह्यातील एलपीजी गॅसचा पुरवठा विस्कळीत होऊ नये आणि ग्राहकांना वेळेत सिलेंडर मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे.आज जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी अत्यंत कडक भूमिका घेत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. घरगुती गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर किंवा अवैध साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले. आंतरराष्ट्रीय ऊर्जा चिंतांमुळे केंद्र सरकारने अत्यावश्यक सेवा देखभाल कायदा (एडच) १९६८ लागू केला असून, गॅस वाटपाचा प्राधान्यक्रम निश्चित केला आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे पुरवठ्यावर परिणाम होऊ नये यासाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. ग्राहकांनी घाबरून न जाता (झरपळल इेज्ञळपस) गरजेनुसारच सिलेंडर नोंदवावे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

जिल्ह्यातील गॅस वितरणाबद्दल माहिती देताना उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले की, ठाणे जिल्ह्यात सुमारे २ लाख २७ हजार ७४२ घरगुती आणि ४ हजार ४३० व्यावसायिक गॅस जोडणीधारक आहेत. जिल्ह्यात १३ प्रमुख गॅस एजन्सी कार्यरत असून त्यांच्यामार्फत दररोज सरासरी ५ हजार ९२२ घरगुती सिलेंडरची तर ६२२ व्यावसायिक सिलेंडरची आवश्यकता असते. अवैध वापर रोखण्यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. आतापर्यंत जिल्ह्यात विविध ठिकाणी १२१ हून अधिक धाडी टाकून तपासणी करण्यात आली आहे.

तक्रार निवारणासाठी नियंत्रण कक्ष..*

जिल्हाधिकारी कार्यालयाने गॅस वितरणाशी संबंधित तक्रारींसाठी विशेष नियंत्रण कक्ष कार्यान्वित केला आहे. गॅस बुकिंग न होणे किंवा सिलेंडर मिळण्यास उशीर होणे, अशा तक्रारी प्राप्त होताच तेल कंपन्यांच्या सेल्स ऑफिसर्समार्फत त्याचे निराकरण केले जात असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

या बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव म्हस्के-पाटील, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सोनाली देवरे, शिधावाटप उपनियंत्रक प्रशांत काळे यांसह तेल कंपन्यांचे प्रतिनिधी आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# देशाच्या सर्वांगिण विकासासाठी पालि भाषा शिका: प्रा. डॉ.एस. एम. सोनेने


लातूर: देशाच्या सर्वांगीन विकासासाठी पालि भाषा सगळ्यांनी शिकली पाहिजे. आपला परिवार, गाव, शहर पालिमय केला पाहिजे. असे आवाहन लातूर येथील प्रज्ञा पालि भाषा प्रशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एस. एम. सोनोने यांनी आज बोधी चौक विक्रमनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले. पालि ही प्राचीन भारत आणि सिमांत प्रदेशाची भाषा होती. नंतर आर्य भारतात आले, त्यांची वैदिक भाषा होती. इसवी सन पूर्व ६०० ते इसवी सन ६०० वर्षापर्यंत हा भारत पालिमय होता. रंक - राव, राजा - प्रजा सर्वच, सर्वत्र पालितच बोलत होते आणि धम्म लिपीत लिहीत होते. बुद्ध दर्शनानुसार, धर्मानुसार वागत होते. कोणीही अंधम्माने वागत नव्हते त्यामुळें भारताची सर्वांगीण प्रगती झाली होती. भारताला सोने की चिडिया संबोधत होते, परंतु



आता भारताची काय अवस्था झाली हे आपण सर्वजण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. म्हणून आम्ही या भारताचे नवे तर किमान महाराष्ट्राचे गतवैभव प्राप्त करण्यासाठी व्यवहारात पालि भाषेचे पुनर्जीवन करत आहोत. असे सांगितले. सध्या महाराष्ट्रापुरता विचार केला तर महाराष्ट्रीयन लोकांना पालिभाषा शिकण्यासाठी आम्ही जळगाव, अकोला, औरंगाबाद आणि लातूर येथे पाली भाषेचे प्रशिक्षण केंद्र स्थापन केले आहे आणि नागपूर पनवेल कोल्हापूर हे तीन केंद्र निर्माण करण्याचा प्रयत्न चालू आहे महाराष्ट्र मध्ये अशा सात केंद्रातून पालीमय महाराष्ट्र करण्यासाठी व्यवहारात पालीतच बोलण्यासाठी पालि भाषेचे विविध कोर्सेस शिकवत आहोत. जगातील एकमेव आश्चर्य म्हणजे अडाणी अशिक्षित लोकांसाठी एक महिन्याचा पालि संभाषण वर्ग आणि सुशिक्षितांसाठी फक्त आठच दिवसात पालि शिका आणि मरेपर्यंत बोला असे हे दोन महा क्रांतिकारी चॅलेंज कोर्स आहेत. तसेच बेसिक पालि स्पोकन पाली आणि डव्हान्स पालि हे तीन कोर्स आहेत. या कोर्समुळे प्रत्येकाला चांगल्या प्रकारे पालि भाषेत लिहिता, वाचता आणि बोलता येते. याला वयाची व शिक्षणाची अट नाही. कोणीही पाली भाषा शिकून बोलू शकते. पालि भाषा शिकून पालितच बोलले तर त्यचे १०० फायदे आहेत. हे लोकांना माहिती नाही. त्यामुळे ते सर्व स्वतःच्या सर्वांगीण विकासापासून वंचित आहेत. असेही ते म्हणाले. या सोबतच प्रबोधनासाठी साहित्य प्रकाशने, मन शांतीसाठी विपस्सना, सुदृढ आरोग्यासाठी, योगासने, गरजू शेतकऱ्यांच्या शेतात शेत तुमचं, झाडं तुमच, फळही तुमचंच - फक्त लागवड आमची या आमच्या तत्त्वावर फळझाडाचे वृक्षारोपण, तरुणांना नोकऱ्या - रोजगार निर्मिती असा कार्यक्रम आखला आहे. आम्ही या महाराष्ट्रामध्ये पालि भाषा शिकवण्यासोबतच ८४ हजार वृक्षारोपण करणे, ८४ हजार लोकांना पालि भाषा शिकवणे, ८४,००० तास व्याख्यान देणे, पाली भाषा व तुकाराम महाराज - संत गाडगेबाबा अशा संत - महापुरुषांचे विचार रुजवणे. असी कामे करत आहेत. अशा ह्या बाबी अंगीकारल्यामुळे, त्याचे आचरण केल्यामुळे हा महाराष्ट्र पुन्हा एकदा धनवान, बलवान, गुणवान, सुखी, समाधानी, तानतनाव मुक्त, दवामुक्त, रोगमुक्त, दुःखमुक्त व दीर्घायुष्यी होईल, तसेच दवाखाने, पोलिस स्टेशन, न्यायालय आणि तुरुंगाचाही ताण कमी होईल. त्यांची संख्या कमी होईल. त्यामुळे आम्ही हे कार्य शासनाच्या आणि अन्य संस्था व दानशूर लोकांच्या मदतीशिवाय स्वतः च्या हिंमतीवर हाती घेतले आहे. वरील बाबींचा लाभ आणि सहभाग घेण्यासाठी गरजूंनी प्रा. डॉ. एस. एम. सोनोने सरांना ९०२८६९४८९१ या नंबरवर संपर्क साधावा.असे आवाहन त्यांनी केले आहेया पत्रकार परिषदेस प्रा. डॉ. एस. एम. सोनोने, वैशाली औसरमल, पल्लवी दांडे, स्नेहा सोनोने उपस्थित होते.

# धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे मार्गासाठी १००० कोटी रुपये तातडीने द्यावे- खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केली केंद्रीय रेल्वे मंत्र्याकडे मागणी

नवी दिल्ली: संसदेच्या अर्थसंकल्पीय




अधिवेशनात रेल्वे मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांवरील चर्चेदरम्यान धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांवर ठाम आणि आक्रमक भूमिका मांडत केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

मराठवाड्याच्या विकासासाठी सक्षम रेल्वे सुविधा अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित करत त्यांनी खालील महत्त्वाच्या मागण्या केल्या:

१. धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे मार्गासाठी १००० कोटी रुपयाची तात्काळ तरतुद करावी

तुळजापूरला रेल्वेने जोडण्याचे दिलेले आश्वासन अद्याप पूर्ण झालेले नाही. धाराशिव ते तुळजापूर या मार्गाचे काम सुरू असले तरी तुळजापूर ते सोलापूर हा टप्पा अजूनही निविदा प्रक्रियेत अडकलेला आहे. या संपूर्ण मार्गासाठी सुमारे २ हजार कोटी रुपयांची आवश्यकता असून केंद्राने आपला १ हजार कोटी रुपयांचा हिस्सा तातडीने मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली. यामुळे आई तुळजाभवानीचे पवित्र तीर्थक्षेत्र रेल्वे नकाशावर येईल.

२. लातूर-पुणे इंटरसिटी गाडी तातडीने सुरू करा

लातूर, धाराशिव आणि बार्शी परिसरातील हजारो विद्यार्थी व नोकरदार दररोज पुण्याकडे प्रवास करतात. सध्याच्या गाड्यांची अपुरी संख्या लक्षात घेता लातूर ते पुणे इंटरसिटी गाडी तातडीने सुरू करावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली.

३. हरंगूळ-पुणे गाडी पुणे मुख्य स्थानकापर्यंत चालवा

सध्या हरंगूळ ते पुणे गाडी हडपसरपर्यंतच धावते, त्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागते. ही गाडी पूर्वीप्रमाणे पुणे मुख्य स्थानकापर्यंत चालवावी, अशी मागणी करण्यात आली.

४. रेल्वे थांबे व नवीन मार्गांचे सर्वेक्षण

कळंब रोड स्थानकावर लातूर-मुंबई गाडीला थांबा देण्यात यावा

ढोकी स्थानकावर नांदेड-पनवेल गाडीला थांबा द्यावा

धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर या नवीन मार्गाच्या सर्वेक्षणासाठी मंजूर निधीबद्दल समाधान व्यक्त करत हे सर्वेक्षण तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी करण्यात आली

५. पुणे-सिकंदराबाद जलद गती मार्ग धाराशिव-लातूरमार्गे न्यावा

पुणे ते सिकंदराबाद या प्रस्तावित जलद गती मार्गाचा समावेश धाराशिव व लातूरमार्गे करण्यात यावा, जेणेकरून मराठवाड्याच्या विकासाला मोठी चालना मिळेल, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली

६. धाराशिवछत्रपती संभाजीनगर रेल्वे मार्गाबाबत विशेष मागणी

छत्रपती संभाजीनगर हे मराठवाड्याचे प्रमुख विभागीय व न्यायिक केंद्र असून येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ, अजिंठा-वेरूळसारखी जागतिक वारसा स्थळे तसेच ऊ. इरलरीरहशल ीलशवज्ञरी चरीरींहुरवर णपळींर्शीीळीं असल्यामुळे मराठवाड्यातील नागरिक, विद्यार्थी व विविध क्षेत्रातील लोकांची येथे सतत ये-जा सुरू असते

धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर हा थेट रेल्वे मार्ग निर्माण करणे अत्यंत आवश्यक असून यामुळे मराठवाड्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होईल, असे खासदारांनी ठामपणे मांडले. या रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणासाठी केंद्र सरकारकडून ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त करत रेल्वे मंत्रालयाचे आभार मानण्यात आले. मात्र हे सर्वेक्षण लवकरात लवकर पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला गती द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली . या मार्गामुळे धाराशिव व परिसरातील नागरिकांना छत्रपती संभाजीनगर येथे प्रवास करणे अधिक जलद, सुरक्षित व सोयीस्कर होणार असून विद्यार्थी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे

# मध्यमवर्गीय सामान्यांच्या वेदनांना आवाज कोण देणार?- गजानन हरणे,समाजसेवक

संसद हे लोकशाहीचे मंदिर म्हणतात. पण या मंदिरात अनेकदा सामान्य माणसाच्या वेदना,त्याचे हुंदके आणि त्याची आर्थिक कोंडी यांचा प्रतिध्वनी फारसा ऐकू येत नाही. तिथे आकड्यांची जादू,योजनांची रंगीत स्वप्ने आणि घोषणांचा गजर ऐकू येतो; परंतु रोजच्या जगण्याच्या चाकावर पाय घसरलेल्या माणसाचा आक्रोश बहुधा दडपून जातो. अशा वेळी एखादा लोकप्रतिनिधी त्या आक्रोशाला शब्द देतो, तेव्हा तो केवळ खासदार राहत नाही.तो लोकांच्या आशेचा किरण ठरतो. राघव चड्ढा यांनी संसदेत उपस्थित केलेले प्रश्न हे केवळ पक्षीय टीकेपुरते मर्यादित नाहीत; ते थेट सामान्य नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याला भिडणारे आहेत. बँकांच्या एकतर्फी कपातीचा मुद्दा असो, मोबाईल कंपन्यांच्या २८ दिवसांच्या रिचार्जचा प्रश्न असो किंवा कररचनेतील विसंगती.या प्रत्येक मुद्द्यामागे सामान्य माणसाची पिळवणूक दडलेली आहे.बँकांच्या कपातीचे गूढ खाते नागरिकाचे,पैसा नागरिकाचा; पण त्यावर आकारले जाणारे शुल्क मात्र बँकांच्या मनमान्यतेचे! मिनिमम बॅलन्स चार्जेस,एसएमएस चार्जेस,एटीएम युज चार्जेस, चेकबुक शुल्क या साऱ्यांची बेरीज केली तर मध्यमवर्गीय खातेदार वर्षाकाठी हजारो रुपये गमावतो. मोठमोठी कर्जे 'राईट ऑफ' केली जातात,पण छोट्या खातेदाराच्या खात्यातील शंभर-दोनशे रुपयांची कपात मात्र अचूक होते. ही विसंगती प्रश्नांकित करण्याचे धाडस जेव्हा एखादा खासदार दाखवतो, तेव्हा लोकांना वाटते कोणी तरी आहे आपल्यासाठी बोलणारा!

मोबाईल कंपन्यांचा '२८ दिवसांचा महिना'

महिन्याची फी,पण सेवा २८ दिवसांची! वर्षात बारा नव्हे तर तेरा वेळा रिचार्ज हा हिशेब सामान्य ग्राहकाच्या लक्षात येतो; पण त्यावर संसदेत प्रश्न उपस्थित होणे ही वेगळीच बाब आहे. शिल्लक डेटा कॅरी फॉरवर्ड का होत नाही? रिचार्ज संपला तरी इनकमिंग कॉल का बंद? या साध्यासोप्या प्रश्नांची उत्तरे लाखो ग्राहक शोधत आहेत.कररचनेचा कोलाहल इंग्लंडसारखे टॅक्स, सोमालियासारख्या सेवाअशी उपमा देत करप्रणालीतील विसंगती मांडली जाते तेव्हा ती केवळ भाषणातील अलंकार राहत नाही; ती लोकांच्या मनातील असंतोषाचे प्रतीक ठरते. आयकर,जीएसटी,अप्रत्यक्ष कर-दहा रुपयांतले सात-आठ रुपये विविध मार्गांनी सरकारकडे जातात,असे जेव्हा सांगितले जाते, तेव्हा त्या पैशाचा उपयोग नेमका कुठे होतो,हा प्रश्न स्वाभाविक ठरतो.

मध्यमवर्ग : विसरलेला घटक?

अर्थसंकल्पात मध्यमवर्गासाठी काय, हा प्रश्न विचारला जातो आणि त्यावर मौन किंवा अस्वस्थ प्रतिक्रिया दिसते, तेव्हा लोकांच्या मनात संशयाची पाल चुकचुकते. बेरोजगारांकडून अर्जफी घेतली जाते; नोकरी न मिळाल्यास ती परत का नाही? हॉस्पिटल्स जेनेरिक औषधे का लिहीत नाहीत? हे प्रश्न केवळ आकड्यांचे नाहीत.ते न्यायाचे आहेत. लोकशाहीत सत्ताधाऱ्यांवर टीका करणे म्हणजे वैर धरणे नव्हे; ती लोकशाहीची प्राणवायू आहे. सरकार कोणतेही असो त्याला लोकांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीच लागतात. आज जर एखादा खासदार सामान्यांच्या समस्या ठामपणे मांडत असेल, तर तो 'हिरो' ठरतो; पण खरे तर प्रत्येक लोकप्रतिनिधीने हे कर्तव्य पार पाडले पाहिजे.सरकारला जाणीवपूर्वक स्मरण करून द्यावेसे वाटते करदात्यांचा पैसा हा केवळ महसूल नसतो; तो विश्वासाचा ठेवा असतो.बँका,कॉर्पोरेट्स, कंपन्या यांना मोकळीक देताना सामान्य नागरिकाच्या हक्कांवर गदा येणार नाही, याची खबरदारी घेणे हीच लोककल्याणकारी राज्याची खरी कसोटी आहे. आज देशातील तरुण, मध्यमवर्गीय, लहान व्यावसायिक आणि गरीब नागरिक यांना केवळ आश्वासनांची नव्हे, तर उत्तरदायित्वाची गरज आहे. संसदेत उठणारा प्रत्येक प्रश्न हा केवळ राजकारणाचा भाग नसून लोकांच्या जगण्याशी निगडित आहे.जर एखादा आवाज या वेदनांना शब्द देत असेल, तर तो आवाज लोकांच्या हृदयात घर करणारच. मात्र, अंतिम ध्येय एकच सर्व लोकप्रतिनिधींनी पक्षभेद विसरून सामान्य माणसाच्या समस्यांना वाचा फोडावी. कारण लोकशाहीचा खरा 'हिरो' एक व्यक्ती नसतो; तो सजग नागरिक आणि उत्तरदायी व्यवस्था यांचा संगम असतो. जागो मतदार जागो!!

**गजानन कुसुम ओंकार हरणे.**
**संवाद...९८२२९४२६२३.**
**जिल्हा परिषद नगर,खडकी,अकोला.**

# नागरिकांनी डी जे, ध्वनीक्षेपकाच्या नियमाचे पालन करावे-स्वप्नील उनवणे

केज/प्रतिनिधी- सर्व धर्माच्या




धार्मिक, सामाजिक कार्यक्रमात नागरिकांनी डी जे आणि ध्वनीक्षेपकाच्या नियमाचे पालन करून समाजात शांतता व सलोखा राखून पोलीस प्रशासनाला सहकार्य करा. आसे आवाहन केज येथील पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी मंगळवारी केज पोलीस ठाण्याच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या शांतता समितीच्या बैठकीत बोलताना केले.

केज नरपंच्यातीच्या नराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी दिनांक १७ मार्च २०२६ केज येथील पोलीस ठाण्याच्या सभागृहात शांतता समितीची बैठक संपन्न झाली.

यावेळी नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड,नगर पंचायतीचे गटनेते हारुणभाई इनामदार, प्रा.हनुमंत भोसले, बाबुराव गालफाडे,हाफिज शब्बीर, विशाल चौरे,यांनी या बैठकीत आपले मनोगत व्यक्त करून पोलीस प्रशासना कडून कांही अपेक्षा व्यक्त केल्या.

यावेळी बोलताना पोलीस नितीक्षक स्वप्नील उनवणे यांनी येणाऱ्या रामनवमी, रमजान ईद, सह इतर सणाच्या दरम्याण सर्वांनी शानतेचे व साळोख्याचे वातावरण ठेवावे. शिव जयंती जशी डी जे मुक्त वातावरणात साजरी झाली. त्याच विविध जयंत्या, वाढदिवस व इतर सोहळ्यासाठी आपण केज तालुक्यात डीजे वाजू देणार नाही.रात्री १० ते सकाळी ६ या वेळे दरम्याण कोणीही ध्वनीक्षेपकाचा वापर करू नये. सर्वांनी डीजे व ध्वनीक्षेपकाच्या नियमाचे पालन करावे. आसे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने,व सुकुमार उर्फ राकेश बनसोडे, जमादार बाळासाहेब अहंकारे,गुप्त वार्ता शिवाजी कागदे, मेटे, यांच्यासह पोलीस कर्मचारी, पत्रकार, व्यापारी व शांतता समितीचे सदस्य हजर होते.

# मालमत्ता कर शास्ती सुट ला मुदतवाढ २२ मार्च पर्यंत चालू राहणार योजना. करदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद.

लातूर/प्रतिनिधी : लातूर शहर महानगरपालिकेमार्फत मालमत्ता करावरील थकीत व्याजावर ७०% सवलत योजना राबविण्यात आली होती. ही योजना सुरुवातीला दि. १५ मार्च २०२६ पर्यंत लागू होती. नागरिकांकडून या योजनेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यामुळे व मुदतवाढ मागणी असल्याने महापौर श्रीमंती जयश्री सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे व आयुक्त श्रीमती मानसी यांनी सदर योजनेला ७ दिवसांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला असून आता ही योजना दि. २२ मार्च २०२६ पर्यंत लागू राहणार आहे.

या योजनेअंतर्गत नागरिकांना मालमत्ता कराच्या थकीत रकमेवरील व्याजामध्ये ७०% पर्यंत सवलत दिली जात आहे. त्यामुळे जास्तीत जास्त करदात्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपला थकीत मालमत्ता कर तात्काळ भरावा, असे आवाहन कर संकलन विभाग मार्फत केले आहे.

तसेच मुदत संपल्यानंतर मालमत्ता कर थकबाकीदारांवर महानगरपालिकेमार्फत जप्ती व अटकावणी ची कार्यवाही करण्यात येणार असून त्यामध्ये मालमत्ता सील करणे, पाणीपुरवठा खंडित करणे इत्यादी उपाययोजना करण्यात येतील. त्यामुळे करदात्यांनी होणारी कटू कार्यवाही टाळण्यासाठी  दिलेल्या मुदतीत सुट चा लाभ घेवून आपला कर भरणा करावा व सहकार्य करावे असे आवाहन उपायुक्त(कर संकलन) यांनी केले आहे

# महाड क्रांती शताब्दी महोत्सवाची सुरवात एक ओंजळ समतेसाठी या अभियानाने उत्साहात साजरी करण्यात आली.

विशेष प्रतिनिधी मुंबई – मुंबई पत्रकार संघ आणि समान संधी अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १३ मार्च २०२६



रोजी मुंबई पत्रकार संघाच्या सभागृहा मध्ये महाड क्रांती शताब्दी महोत्सवाची सुरवात एक ओंजळ समतेसाठी.. अशा एका अभिनव अभियानाने सुरू करण्यात आली.यावेळी भारतीय संविधानाची प्रास्ताविका प्रसिद्ध अभिनेते किरण माने यांनी वाचून सर्वांना प्रतिज्ञा देण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध अभिनेते आणि सामाजिक भान असलेले प्रमुख वक्ते मान.किरण माने हे होते. त्याच बरोबर मुंबई विद्यापिठाचे पत्रकारिता विभागप्रमुख डॉ.सूंदर राजदीप हे ही उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी मुंबई पत्रकार संघांचे अध्यक्ष संदीप चव्हाण होते.जेष्ठ पत्रकार तसेच आंबेडकर चळवळीचे अभ्यासक दिवाकर शेजवळ यांनी पाहुण्यांचे स्वागत व परिचय करून दिशादर्शक असे आपले विचार व्यक्त केले.समान संधी अभियानाचे अध्यक्ष सुनील कदम यांनी कार्यक्रमाची भूमिका प्रभावीपणे मांडणी केली.

कार्यक्रमात आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ट नेते साहित्यिक अर्जुन डांगळे,माजी मंत्री हुसेन दलवाई,पॅंथर सुरेश पगारे, अनेक मान्यवरासह मोठ्या संख्येने सामाजिक कार्यकर्ते,विचारवं त,साहित्यिक,पत्रकार व कामगार नेते उपस्थित होते.कार्यकर्माचे सूत्रसंचालन राजू रोटे आणि अनघा जाधव यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी नामदेव साबळे,गजानन सिरसाट प्रमोद नाईक,संजय कांबळे, ऍड. जालिंदर यादव,यांनी विशेष कष्ट घेतले.

एक ओंजळ समतेसाठी.. ही थीम घेऊन महाड क्रांती शताब्दी महोत्सव वर्ष भर विभागा विभागात राबविण्याचा संकल्प समान संधी अभियान च्या वतीने करण्यात आला.अनेक कार्यकर्त्यांनी कार्यक्रम झाल्यावर असे कार्यक्रम आता गरजेचे असून ते आपण सर्व मिळून महाराष्ट्रभर घ्यावेत ही भावना व्यक्त केली.

# लातूर महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते उद्घाटन

लातूर (प्रतिनिधी): महसूल




विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सांघिक भावना वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने आयोजित 'लातूर जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२५-२६' चे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले. जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित या सोहळ्यात ध्वजारोहण व दीपप्रज्वलन करून स्पर्धेला सुरुवात झाली.



यापसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी आणि जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विविध उपविभागातील खेळाडूंनी शिस्तबद्ध पथसंचलन (परेड) केले. संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी आपापल्या पथकाचे नेतृत्व केले. यावेळी सर्व स्पर्धकांना क्रीडा नियमांचे पालन करण्याची शपथ देण्यात आली. उद्घाटनानंतर झालेल्या झुंबा डान्समध्ये जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्वतः सहभागी होऊन कर्मचाऱ्यांचा उत्साह द्विगुणित केला.

कोतवाल ते अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी अशा सर्व संवर्गातील कर्मचारी-अधिकारी यांचा या स्पर्धेतील उत्स्फूर्त सहभाग कौतुकास्पद आहे. लातूर जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धे त सहभागी सर्व खेळाडूंनी सांघिक भावनेने आणि चिकाटीने आपल्या खेळाचे प्रदर्शन करावे. लातूर जिल्ह्याला राज्यस्तरीय स्पर्धेत जास्तीत जास्त प्रतिनिधित्व मिळवावे, यासाठी सर्वांनी मनपासून प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. अतिशय कमी कालावधीत स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

या स्पर्धा म्हणजे केवळ क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम नसून सतत कामाच्या तणावात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवी ऊर्जा देणारा उपक्रम आहे. स्पर्धे त सहभागी खेळाडूंनी पूर्ण सचोटीने सहभाग नोंदवून चांगली कामगिरी करावी. दैनंदिन जबाबदाऱ्या पार पाडताना आपले आरोग्य, शारीरिक स्वास्थाकडे लक्ष द्यावे. एखाद्या मैदानी खेळाची आवड जोपासून त्यासाठी नियमितपणे वेळ द्यावा, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले.

महसूल विभागाच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंची परेड अतिशय उत्स्फूर्त झाली. सर्वांनी दोन दिवसीय स्पर्धा काळात कामाचा ताण विसरून खेळांमध्ये सहभागी होवून चांगली कामगिरी करावी. या स्पर्धेतील सहभागाचा आनंद अनुभवा, मनापासून खेळा. खेळ असो की दैनंदिन जबाबदाऱ्या, जिंकल्यावर जल्लोष करणे, पराभवानंतर खिलाडूवृत्तीने पराभव स्वीकारणे आवश्यक असते. महसूल, पोलीस विभागाच्या जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धा होतात. मात्र लातूर जिल्ह्यातील महसूल, पोलीस आणि इतर विभागांच्या एकत्रित स्पर्धांचे आयोजन व्हावे. विविध विभागांच्या एकत्रित स्पर्धा झाल्यास विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्यातील बाँडिंग वाढण्यासाठी मदत होईल, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छांऐवजी ग्रंथ देऊन करण्यात आले. तसेच विविध महसूल अधिकारी आणि कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींचाही यावेळी गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले. या दोन दिवसीय स्पर्धे त विविध मैदानी खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# ठाणे जिल्ह्याची जिल्हा सल्लागार व आढावा समिती बैठक संपन्न

ठाणे(जिमाका): ठाणे जिल्ह्याची जिल्हा सल्लागार समिती (ऊउउ) व जिल्हास्तरीय आढावा समिती (ऊ्हठउ) बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पडली.



या बैठकीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी वार्षिक कर्ज योजना (उझ) २०२५-२०२६ अंतर्गत बँकांच्या कामगिरीचा सविस्तर आढावा घेतला. यामध्ये प्रामुख्याने स्वयं सहाय्यता गट (डक्रह) कर्ज, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (झचत्रुवए), प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (झचएत्रझ), मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (उचएत्रझ), प्रधानमंत्री विश्वकर्मा, प्रधानमंत्री स्वनिधी, प्रधानमंत्री मुद्रा योजना तसेच राज्य शासनाच्या विविध विकास महामंडळांच्या योजनांचा समावेश होता.

बँकांनी कर्ज मंजूर करून शासकीय योजनांचा लाभ वंचित घटकांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. मात्र, खासगी क्षेत्रातील बँकांची कामगिरी शासकीय योजनांच्या बाबतीत अत्यंत निकृष्ट असल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

जिल्ह्यातील कर्ज-ठेव गुणोत्तर (CD Ratio) सुधारण्यावर भर देतानाच, आर्थिक समावेशन अंतर्गत सामाजिक सुरक्षा योजनांमध्येप्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (झचगगइध), प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (झचडइध) आणि अटल पेन्शन योजना (झध)बँकांनी केलेल्या कामावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. राष्ट्रीय आर्थिक समावेशन धोरण (छडत्रख) २०२५-२०३० अंतर्गत कृती आराखड्याचा आढावा घेतानाच, प्रधानमंत्री स्वनिधी योजनेचा विस्तार आणि तिची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात आला.

यासोबतच नाबार्डशी संबंधित विषय, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (ठडएढख) व आर्थिक साक्षरता केंद्रे (ऋडउ/उत्रङ) यांच्या कार्यपद्धतीवरही चर्चा करण्यात आली.

डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व बँकांना शासकीय पुरस्कृत योजनांतर्गत निर्धारित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्यासाठी आपली कामगिरी अधिक सुधारण्याच्या कडक सूचना दिल्या. सर्व बँका आणि शासकीय विभागांनी परस्परांशी समन्वय राखून कर्ज वितरण, आर्थिक समावेशन आणि सर्व शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

या बैठकीस अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. हरिश्चंद्र पाटील, आरबीआयचे एलडीओ श्री.निशांत यादव (ऑनलाईन), नाबार्डचे डीडीएम श्री. सुधांशुकुमार अश्विनी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक श्री.अभिषेक पवार, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सौ. सोनाली देवरे, टीडीसीसीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र भेरे, आरसेटीचे संचालक श्री. आशिष लोहकरे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख, विकास महामंडळांचे जिल्हा व्यवस्थापक आणि बँकांचे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.